## सुचना

ठिकाण :- नाशिक ग्रामीण.

दिनांक :- ०७/०४/२०१७

दिनांक २२/०३/२०१७ ते ०३/०४/२०१७ या कालावधीत नाशिक ग्रामीण आस्थापनेवरील रिक्त पदाच्या ७५ टक्के पदे भरण्यांसाठी शारिरिक चाचणी परिक्षा घेण्यात आली. सदर शारिरीक चाचणीत किमान ५० टक्के गुण मिळवुन उत्तीर्ण झालेल्या जाहिरातीत प्रवर्ग निहाय नमुद पदसंख्येच्या १:१५ या प्रमाणात लेखी परीक्षेसाठी पात्र उमेदवारांची प्रवर्ग निहाय गुणवत्ता यादी दिनांक ०७/०४/२०१७ रोजी प्रसिध्द करण्यांत आलेली आहे. या यादीनुसार उमेदवारांना १०० गुणाच्या लेखी परीक्षेसाठी पात्र ठरविण्यांत आले आहे.

नाशिक ग्रामीण जिल्हा पोलीस भरती २०१७ मध्ये शारिरीक चाचणीचा निकाल www.mahapolice.gov.in व mahapolice.mahaonline.gov.in व नाशिक ग्रामीण घटकाचे संकेतस्थळांवर www.nashikruralpolice.gov.in उपलब्ध आहे.सदर निकालाच्या यादया पोलीस मुख्यालय नाशिक ग्रामीण, आडगांव येथे नोटीस बोर्डवर प्रसिध्द करण्यात आलेल्या आहे.

नाशिक ग्रामीण जिल्हा पोलीस भरतीतील पात्र उमेदवारांची लेखी परीक्षा रविवार दिनांक १६/०४/२०१७ रोजी नाशिक ग्रामीण पोलीस मुख्यालय, आडगांव येथे सकाळी ०७:०० ते ०८:३० या वेळेत घेण्यांत येणार आहे. ०७:१० नंतर आलेल्या उमेदवारांना परीक्षेसाठी प्रवेश दिला जाणार नाही. सदर परीक्षेसाठी पात्र उमेदवारांनी रविवार दिनांक १६/०४/२०१७ रोजी सकाळी ०५:०० वाजता नाशिक ग्रामीण पोलीस मुख्यालय, आडगांव येथे ओळखपत्र, पॅड व काळया शाईचे बॉलपेनसह उपस्थित राहावे. परीक्षेसाठी येताना कॅल्क्युलेटर, मोबाईल फोन आणु नयेत.

जर कोणत्याही उमेदवाराला १:१५ यादीतील गुण अथवा स्थानाबद्दल काही अक्षेप असतील तर त्यांनी यादी प्रसिध्द झाल्याच्या वेळेपासुन ४८ तासाचे आत कार्यालय अधीक्षक ना.ग्रा/पोलीस उप अधीक्षक,(मुख्या.) नाशिक ग्रा. यांचेकडे समक्ष हजर राहुन लेखी तक्रार करावी. सदर तपासणी करीता कार्यालय अधीक्षक ना.ग्रा/ पोलीस उप अधीक्षक(मुख्या.), नाशिक ग्रामीण यांना प्राधिकृत करण्यांत आलेले असल्याने त्यांचा निर्णय अंतिम राहील. ४८ तासानंतर उमेदवारांची विंनती अमान्य करण्यांत येईल.

07/04/17

( अंकुश शिंदे )

पोलीस अधीक्षक, नाशिक ग्रामीण.